# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/ सा.प्र./७८४/2025-26

दि.१३ /६ /2025

**परिपत्रक**

**विषय :-** माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ४ अन्वये संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्याबाबत.

**संदर्भ :-** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग संकीर्ण-२०१८/प्र.क्र.६६/सहा, दि. १३/०४/२०१८.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ अन्वये निर्धारित केलेली माहिती प्रकट करणेबाबत राज्य शासनाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रकान्वये सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सूचना दिलेल्या आहेत, तथापी मा. राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिलांचा ओघ वाढत असून अपिलांची प्रलंबितता वाढत आहे, त्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणांकडे मोठ्या प्रमाणात ज्या बाबींची माहिती, माहिती अधिकारांतर्गत मागितली जाते त्या बाबींची माहिती सार्वजनिक प्राधिकरणांने स्वयंप्रेरणेने प्रसिध्द केल्यास माहिती अधिकार अर्जाचे प्रमाण कमी होईल. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अर्जदाराचे समाधान करण्याचा प्रयत्न केल्यास व आपल्या आदेशाची पूर्तता करण्याबाबत आढावा घेतल्यास मा. राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणाऱ्या व्दितीय अपिलांची संख्या कमी होण्यास मदत होईल. त्याकरिता माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ४ ची अंमलबजावणी अधिक परिणामकारकरित्या करणेबाबत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१८/प्र.क्र.६६/सहा, दिनांक १३/०४/२०१८ अन्वये वरीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

तरी संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन करून कलम ४ अन्वये निर्धारित केलेली माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या (www.mbmc.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी .

**सुनिल यादव**
**सहा. आयुक्त (सा.प्र.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**
सर्व विभागप्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका